web
२३।१२।०९

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक :- एसईसी/जीईएन/२००१/प्र.क्र.२९/का.१०,
नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- ३१ मार्च, २००९

प्रति,
आयुक्त,
महानगरपालिका (सर्व)
जिल्हाधिकारी (सर्व) (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

विषय :- स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक लढविण्यासाठी दोनपेक्षा अधिक अपत्ये असलेल्या व्यक्तींना अनर्ह ठरविण्याबाबत...
संदर्भ :- राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दि. १२ जुलै, २००१ चे पत्र.

महोदय,

राज्य निवडणूक आयोगाचे संदर्भाधिन पत्र व त्यासोबत देण्यात आलेली शपथपत्रे / घोषणापत्रे याद्वारे मागे घेण्यात येत असून स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणुक लढविण्याकरिता उमेदवाराने अपत्यांसंदर्भात दयावयाची शपथपत्रे / घोषणापत्रे याद्वारे विहित करण्यात येत आहेत.

महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायती यांच्या निवडणुका लढविण्यासाठी आवश्यक असलेल्या पात्रतेसंदर्भात शासनाने महाराष्ट्र महानगरपालिका आणि नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) अधिनियम, १९९५ तसेच मुंबई ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (सुधारणा) अधिनियम, १९९५ पारित केले असून, या दोन्ही अधिनियमांना मा. राज्यपालांची संमती प्राप्त झालेली आहे. सदर दोन्ही

अधिनियमांद्वारे (१) मुबई महानगरपालिका अधिनियम, १८८८, (२) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, (३) नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८, (४) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५, (५) मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८, (६) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यामधील अनर्हतेशी संबंधित कलमांमध्ये सुधारणा केल्या आहेत. या दोन्ही अधिनियमांच्या प्रती सोबत जोडून पाठविण्यात येत आहेत.

२. उपरोक्त नमूद सुधारणेद्वारे स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक लढविण्यासाठी ज्या अपात्रता संबंधित अधिनियमाद्वारे यापूर्वी विहित करण्यात आल्या आहेत, त्यामध्ये आणखी एक अपात्रता समाविष्ट करण्यात आली असून, दोनपेक्षा अधिक मुले असलेल्या व्यक्ती यापुढे उपरोक्त नमूद स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढविण्यासाठी अपात्र ठरविण्यात येणार आहेत. या संदर्भात आणखी खालीलप्रमाणे स्पष्ट करण्यात येत आहे :-

(१) अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास म्हणजेच दिनांक १३ सप्टेंबर, २००० रोजी असलेल्या अपत्यांची संख्या दोनपेक्षा अधिक असली तरीदेखील अशा व्यक्ती निवडणूक लढविण्यासाठी अपात्र ठरणार नाहीत. तथापि, सदर तारखेनंतर मुलांच्या संख्येत भर पडून एकूण अपत्यांची संख्या दोनपेक्षा अधिक झाल्यास अशा व्यक्ती निवडणूक लढविण्यासाठी अपात्र ठरतील. परंतु-

अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीत म्हणजेच दिनांक १३ सप्टेंबर, २००० ते दिनांक १२ सप्टेंबर, २००१ या एक वर्षाच्या कालावधीत एकाच प्रसुतीमध्ये जन्माला आलेले एक अपत्य किंवा एकापेक्षा अधिक अपत्ये या अधिनियमानुसार अपात्रतेच्या प्रयोजनासाठी विचारात घेतली जाणार नाहीत.

(२) दिनांक १२ सप्टेंबर, २००१ नंतर झालेल्या मुलामुळे एकूण अपत्यांची संख्या दोनपेक्षा अधिक झाल्यास अथवा आधीच दोनपेक्षा अधिक असलेल्या अपत्यांच्या संख्येत दिनांक १२/९/२००१ नंतर भर पडल्यास अशा व्यक्ती वरील नमूद स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढविण्यास अपात्र ठरतील.

(३) ज्यावेळी एखादया जोडप्याला अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास म्हणजेच दिनांक १३ सप्टेंबर, २००० रोजी किंवा त्या दिनांकानंतर फक्त एकच मूल असेल आणि त्यानंतरच्या एकाच प्रसुतीमध्ये कितीही मुलांचा जन्म झाला तर ते एकच मूल असल्याचे समजण्यात येईल.

(४) "मूल" यामध्ये दत्तक असलेले मूल किंवा मुले यांचा समावेश होत नाही.

D:\KASHMI\dk\order of disqualification.doc/rsk

३. प्रस्तुत सुधारणेमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढविण्यासाठी एखादी व्यक्ती अपात्र ठरते किंवा कसे, याविषयी निवडणूक निर्णय अधिकारी यांना निर्णय घेणे सुलभ व्हावे, या हेतुने राज्य निवडणूक आयोगाने एक शपथपत्र विहित केले असून, त्याचा नमुना सोबत जोडला आहे. कोणत्याही व्यक्तीस महानगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायत/जिल्ह परिषद अथवा पंचायत समिती यापैकी कोणतीही निवडणूक लढवावयाची असेल त्यावेळी सादर करावयाच्या नामनिर्देशनपत्रासोबत सोबत जोडलेले शपथपत्र (Duly sworn in) रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर सादर करणे बंधनकारक राहील. असे शपथपत्र प्रथमवर्ग दंडाधिकारी, ओथ कमिशनर, नोटरी पब्लिक किंवा शपथपत्र देण्यासाठी सक्षम असलेले प्राधिकारी अथवा शासकीय अधिकारी (यामध्ये उपविभागीय अधिकारी, वर्ग-१ तसेच तहसिलदार, वर्ग-१ यांचा समावेश होतो.) यांच्यापुढे करावे लागेल. ग्रामपंचायतीची निवडणूक लढविण्यासाठी मात्र शपथपत्र करण्याची आवश्यकता नसून सोबत जोडलेल्या नमुन्यातील घोषणापत्र भरुन घेणे बंधनकारक राहील.

४. राज्य निवडणूक आयोगाने यापूर्वी राजकारणाचे गुन्हेगारीकरणाच्या संदर्भात विहित केलेले शपथपत्र व त्यासोबतचे प्रपत्र याव्यतिरिक्त वरील नमूद शपथपत्र/घोषणापत्र वेगळयाने सादर करावयाचे आहे, याची कृपया नोंद घ्यावी व त्यानुसार निवडणुकीच्यावेळी संबंधित उमेदवारांना याची कल्पना देण्यात यावी. निवडणुकीच्यावेळी उमेदवारांना दयावयाच्या माहितीपत्रामध्ये विषयाधीन अधिनियमाद्वारे करण्यात आलेल्या तरतुदींचीदेखील माहिती समाविष्ट करण्यात यावी.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

( रा. नी. मांडे )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

D:\RASHMI\dc, order of disqualification doc\sk

## शपथपत्र

मी, श्री /श्रीमती ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... (स्वतःचे नांव)
श्री. ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... .. (वडिलांचे / पतीचे नाव) यांचा / यांची मुलगा / मुलगी / पत्नी, वय- ... ... वर्ष, राहणार ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... (पत्ता) खालीलप्रमाणे प्रतिज्ञेवर सांगतो / सांगते आणि घोषित करतो /करते की,

१. मी ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ...* महानगरपालिका / नगर परिषद / नगर पंचायत / जिल्हा परिषद / पंचायत समिती च्या निवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्र भरीत आहे.

२. माझ्या आज रोजी असलेल्या अपत्यांची संख्या ... ... ... ... ... इतकी आहे. त्यापैकी दिनांक- १३ सप्टेंबर, २००० नंतर जन्मलेल्या माझ्या अपत्यांची संख्या ... ... ... ... इतकी आहे (असल्यास, त्यांच्या जन्मतारखा नमूद कराव्यात.)

३. दिनांक- १२ सप्टेंबर, २००१ नंतर माझ्या एकूण मुलांच्या संख्येत भर पडून ती दोनपेक्षा जास्त झाल्यास मी उपरोक्त स्थानिक स्वराज्य संस्थेचा सदस्य म्हणून राहण्यास अपात्र ठरेन याची मला जाणीव आहे.

अभिसाक्षी,

स्थळ :
दिनांक :

माझ्यापुढे तपासले,
(तपासणी प्राधिकाऱ्याची स्वाक्षरी व शिक्का)

- लागू नसेल ते खोडावे.

---

## घोषणापत्र

मी, श्री /श्रीमती ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... (स्वतःचे नांव)
श्री. ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... .. (वडिलांचे / पतीचे नांव) यांचा / यांची मुलगा / मुलगी / पत्नी, वय- ... ... वर्ष, राहणार ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... (पत्ता) खालीलप्रमाणे प्रतिज्ञेवर सांगतो / सांगते आणि घोषित करतो /करते की.

१. मी ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ग्रामपंचायतीच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्र भरीत आहे.

२. माझ्या आज रोजी असलेल्या अपत्यांची संख्या ... ... ... ... ... इतकी आहे. त्यापैकी दिनांक- १३ सप्टेंबर, २००० नंतर जन्मलेल्या माझ्या अपत्यांची संख्या ... ... ... ... इतकी आहे (असल्यास, त्यांच्या जन्मतारखा नमूद कराव्यात.)

३. दिनांक- १२ सप्टेंबर, २००१ नंतर माझ्या एकूण मुलांच्या संख्येत भर पडून ती दोनपेक्षा जास्त झाल्यास मी उपरोक्त स्थानिक स्वराज्य संस्थेचा सदस्य म्हणून राहण्यास अपात्र ठरेन याची मला जाणीव आहे.

अभिसाक्षी,

स्थळ :
दिनांक :

माझ्यापुढे तपासले,
(तपासणी प्राधिकाऱ्याची स्वाक्षरी व शिक्का)

* लागू नसेल ते खोडावे.

## Affidavit

I, Shri. / Smt. ...................................................... son/daughter/wife of Shri. ........................................ aged ...... years. resident of ................................................................................................................ do hereby solemnly affirm and declare as follows :-

1. That I have filed my nomination paper(s) for election to the *Municipal Corporation / Municipal council / Nagar Panchayat / Zilla Parishad / Panchayat Samiti.
2. I have .................. (Number) children as on today. Out of which the no. of children born after 13th September, 2000 is ....... (Mention the dates of birth if any).
3. I am aware that if my total number of children are more than two due to the children born after 12th September 2001, I am liable to be disqualified for being a Member of aforesaid local self governing body.

Place :- Deponent

Date :- Verified before me
(Signature of verifying authority with)

- Strike off whichever is not applicable.

---

## Declaration

I, Shri./Smt. .................................................... son/daughter/wife of Shri. ........................................ aged ....... Years, resident of ................................................................................ do hereby declare as follows :-

1. That I have filed my nomination paper(s) for the .................. Village Panchayat election.

2. I have ........... (Number) children as on today. . Out of which no. of children born after 13th September, 2000 is ...... (Mention the dates of birth if any).

3. I am aware that if my total number of children are more than two due to the children born after 12th September 2001, I am liable to be disqualified for being a Member of aforesaid local self governing body.

Place :- Deponent

Date :- Verified before me
(Signature of verifying authority with)

असा. क्र. ६४ रजिस्टर्ड नं. टीईसीएन/४७-३०३/एमबीआय/२०००

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

प्राधिकृत प्रकाशन

बुधवार, सप्टेंबर १३, २०००/भाद्र २२, शके १९२२

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम

अनुक्रमणिका


| | पृष्ठे |
|---|---|
| सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३.—मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम | ४५२-४५५ |


दिनांक ९ सप्टेंबर २००० रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

प्रतिभा उमरजी,
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

### सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३.

[मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक १३ सप्टेंबर २००० रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.]

**मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

१८८८ चा मुंबई ३. १९४९ चा मुंबई ५९. १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड २. १९६५ चा महा. ४०.

ज्याअर्थी, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांत आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या एकावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

## प्रकरण एक
## प्रारंभिक.

संक्षिप्त नाव. १. या अधिनियमाला, महाराष्ट्र महानगरपालिका आणि नगरपरिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) अधिनियम, १९९५ असे म्हणावे.

## प्रकरण दोन
## मुंबई महानगरपालिका अधिनियमातील सुधारणा.
## (१८८८ चा मुंबई ३)

सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १६ ची सुधारणा.

२. मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १६ मधील पोट-कलम (१) मध्ये, खंड (ब) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :— १८८८ चा मुंबई ३.

" (बअ) तिला दोनपेक्षा अधिक मुले असतील तर :

परंतु, महाराष्ट्र महानगरपालिका आणि नगरपरिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) अधिनियम, १९९५ याच्या प्रारंभाच्या दिनांकास (या खंडात यापुढे ज्याचा निर्देश " अशा प्रारंभाचा दिनांक " असा करण्यात आला आहे), दोन मुलांपेक्षा अधिक मुले असणारी व्यक्ती, अशा प्रारंभाच्या दिनांकास तिला असणाऱ्या मुलांच्या संख्येत वाढ होत नाही तोपर्यंत या खंडान्वये निरर्ह ठरणार नाही : २००० चा महा. ४३.

परंतु, आणखी असे की, अशा प्रारंभाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीत, एकाच प्रसूतीमध्ये जन्माला आलेले एक मूल किंवा एकापेक्षा अधिक मुले या खंडात नमूद केलेल्या निरर्हतेच्या प्रयोजनाकरिता विचारात घेतली जाणार नाहीत.

स्पष्टीकरण.—या खंडाच्या प्रयोजनार्थ,—

(एक) ज्या वेळी एखाद्या जोडप्याला, अशा प्रारंभाच्या दिनांकाला किंवा त्या दिनांकानंतर आणि त्यानंतर फक्त एकच मूल असेल आणि त्यानंतरच्या एकाच प्रसूतीमध्ये कितीही मुलांचा जन्म झाला तरी ते एकच मूल असल्याचे समजण्यात येईल ;

(दोन) " मूल " यामध्ये दत्तक घेतलेले मूल किंवा मुले यांचा समावेश होत नाही. ".

## प्रकरण तीन
## मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ यामध्ये सुधारणा.

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम १० ची सुधारणा.

३. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ याच्या कलम १० मधील, पोट-कलम (१) मध्ये खंड (ह) नंतर, पुढील खंड जादा दाखल करण्यात येईल :— १९४९ चा मुंबई ५९.

" (आय) तिला दोनपेक्षा अधिक मुले असतील तर :

परंतु, महाराष्ट्र महानगरपालिका आणि नगरपरिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) अधिनियम, १९९५ याच्या प्रारंभाच्या दिनांकास (या खंडात यापुढे ज्याचा २००० चा महा. ४३.

निर्देश " अशा प्रारंभाचा दिनांक " असा करण्यात आला आहे), दोन मुलांपेक्षा अधिक मुले असणारी व्यक्ती, अशा प्रारंभाच्या दिनांकास तिला असणाऱ्या मुलांच्या संख्येत वाढ होत नाही तोपर्यंत या खंडान्वये निरर्ह ठरणार नाही :

परंतु, आणखी असे की, अशा प्रारंभाच्या दिनांकापासून एका वर्षाच्या कालावधीत, एकाच प्रसूतीमध्ये जन्माला आलेले एक मूल किंवा एकापेक्षा अधिक मुले या खंडात नमूद केलेल्या निरर्हतेच्या प्रयोजनाकरिता विचारात घेतली जाणार नाहीत.

स्पष्टीकरण.---या खंडाच्या प्रयोजनार्थ,---

(एक) ज्यावेळी एखाद्या जोडप्याला, अशा प्रारंभाच्या दिनांकाला किंवा त्या दिनांकानंतर आणि त्यानंतर फक्त एकच मूल असेल आणि त्यानंतरच्या एकाच प्रसूतीमध्ये कितीही मुलांचा जन्म झाला तरी ते एकच मूल असल्याचे समजण्यात येईल;

(दोन) " मूल " यामध्ये दत्तक घेतलेले मूल किंवा मुले यांचा समावेश होत नाही. ".

## प्रकरण चार

## नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ यामध्ये सुधारणा

१९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड २. ४. नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४९ याच्या कलम १५ मधील, खंड (आय) नंतरच्या स्पष्टीकरणानंतर पुढील खंड जादा दाखल करण्यात येईल :— सन १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ याच्या कलम १५ ची सुधारणा.

" (ज) तिला दोनपेक्षा अधिक मुले असतील तर :

२००० चा महा. ४३ परंतु, महाराष्ट्र महानगरपालिका आणि नगरपरिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) अधिनियम, १९९५ याच्या प्रारंभाच्या दिनांकास (या खंडात यापुढे ज्याचा निर्देश " अशा प्रारंभाचा दिनांक " असा करण्यात आला आहे) दोन मुलांपेक्षा अधिक मुले असणारी व्यक्ती, अशा प्रारंभाच्या दिनांकास तिला असणाऱ्या मुलांच्या संख्येत वाढ होत नाही तोपर्यंत या खंडान्वये निरर्ह ठरणार नाही :

परंतु, आणखी असे की, अशा प्रारंभाच्या दिनांकापासून एका वर्षाच्या कालावधीत, एकाच प्रसूतीमध्ये जन्माला आलेले एक मूल किंवा एकापेक्षा अधिक मुले या खंडात नमूद केलेल्या निरर्हतेच्या प्रयोजनाकरिता विचारात घेतली जाणार नाहीत.

स्पष्टीकरण.—या खंडाच्या प्रयोजनार्थ,—

(एक) ज्यावेळी एखाद्या जोडप्याला, अशा प्रारंभाच्या दिनांकाला किंवा त्या दिनांकानंतर आणि त्यानंतर फक्त एकच मूल असेल आणि त्यानंतरच्या एकाच प्रसूतीमध्ये कितीही मुलांचा जन्म झाला तरी ते एकच मूल असल्याचे समजण्यात येईल;

(दोन) " मूल " यामध्ये दत्तक घेतलेले मूल किंवा मुले यांचा समावेश होत नाही ".

## प्रकरण पाच

## महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यामध्ये सुधारणा

१९६५ चा महा. ४०. ५. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याच्या कलम १६ मधील पोट-कलम (१) मध्ये खंड (ज) नंतर पुढील खंड जादा दाखल करण्यात येईल :— (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम १६ ची सुधारणा.)

" (के) जिला दोनपेक्षा अधिक मुले असतील अशी व्यक्ती :

२००० चा महा. ४२. परंतु, महाराष्ट्र महानगरपालिका आणि नगरपरिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) अधिनियम, १९९५ याच्या प्रारंभाच्या दिनांकास (या खंडात यापुढे ज्याचा निर्देश " अशा प्रारंभाचा दिनांक " असा करण्यात आला आहे), दोन मुलांपेक्षा अधिक मुले असणारी व्यक्ती, अशा प्रारंभाच्या दिनांकास तिला असणाऱ्या मुलांच्या संख्येत वाढ होत नाही तोपर्यंत या खंडान्वये निरर्ह ठरणार नाही :

परंतु, आणखी असे की, अशा प्रारंभाच्या दिनांकापासून एका वर्षाच्या कालावधीत, एकाच प्रसूतीमध्ये जन्माला आलेले एक मूल किंवा एकापेक्षा अधिक मुले या खंडात नमूद केलेल्या निरर्हतेच्या प्रयोजनाकरिता विचारात घेतली जाणार नाहीत.

स्पष्टीकरण.—या खंडाच्या प्रयोजनार्थ.—

(एक) ज्यायोगे एखाद्या जोडप्याला, अशा प्रारंभाच्या दिनांकाला किंवा त्या दिनांकानंतर आणि त्यानंतर फक्त एकच मूल असेल आणि त्यानंतरच्या एकाच प्रसूतीमध्ये कितीही मुलांचा जन्म झाला तरी ते एकच मूल असल्याचे समजण्यात येईल ;

(दोन) " मूल " यामध्ये दत्तक घेतलेले मूल किंवा मुले यांचा समावेश होत नाही ".